# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 30.01.2026 वार- शुक्रवार

---

**पवार निधन तपास**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास महाराष्ट्र गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात सीआयडीकडे सोपवण्यात आला आहे. विभागानं या माहितीला दुजोरा दिला आहे. गेल्या बुधवारी बारामती विमानतळावर उतरत असताना या विमानाचा अपघात होऊन अजित पवार यांच्यासह ५ जणांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली होती. आता हा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे.

या अपघाताची चौकशी वेगाने करण्यासाठी सहकार्य करावं असं आवाहन केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केलं आहे. विमान अपघात अन्वेषण ब्यूरो तर्पे सुरु असलेल्या चौकशीत अपघातस्थळी आवश्यक सहकार्य करावं असं त्यांनी फडणवीस यांना लिहीलेल्या पत्रात म्हटलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वर्षा' निवासस्थानी भेट घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर उपमुख्यमंत्रीपद तसंच त्यांच्याकडे असलेली खाती कुणाकडे सोपवली जाणार, याबाबत सुरु असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची मानली जात आहे.

अजित पवारांकडे राज्याच्या उपमुख्यमंत्री पदासोबत अर्थ आणि नियोजन, उत्पादन शुल्क आणि क्रिडा खात्याचा कार्यभार होता.

दरम्यान, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचं एकत्रिकरण करण्याच्या प्रयत्नात होते, असं त्यांचे बारामतीतले जवळचे मित्र किरण गुजर यांनी सांगितलं. याबाबतची सगळी प्रक्रिया पूर्ण झाली असून येत्या काही दिवसातच दोन्ही गटांचं विलिनीकरण होईल, असं विमान दुर्घटनेच्या पाच दिवस आधी अजित पवार यांनी आपल्याला सांगितलं होतं, असं गुजर म्हणाले.

**साखर**

राज्यात सद्यःस्थितीत 777 लाख 41 हजार 466 मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण झाले आहे. तर 9 पूर्णांक 1 टक्के निव्वळ उताऱ्यानुसार साखरेचे 71 लाख मेट्रिक टन इतके उत्पादन तयार झालेले आहे. राज्यातील 206 साखर कारखान्यांकडून प्रतिदिन 10 लाख 43 हजार 550 मे.टन ऊसगाळप सुरू असून हंगाम जोमाने सुरू आहे. सध्याची ऊस गाळप क्षमता विचारात घेतल्यास शिल्लक उसाचे गाळप हे फेबुवारी महिनाअखेर किंवा 10 मार्चपर्यंत चालू राहून यंदाचा हंगाम संपण्याची अपेक्षा असल्याचं साखर आयुक्तालयाचे साखर सह संचालक महेश झेंडे यांनी सांगितलं आहे.

**पुणे महापौर**

पुणे महापालिकेची महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक येत्या 9 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता होणार आहे. या पदांसाठी 3 फेब्रुवारीला उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येतील. विशेष सभेत जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक होणार आहे.

दरम्यान पुणे महापालिकेत भारतीय जनता पक्षाच्या गटनेतेपदी गणेश बिडकर यांची निवड करण्यात आली आहे. महापौर निवडीनंतर बिडकर हे सभागृह नेते होतील. यापूर्वी 2022 पर्यंत बिडकर यांनी सभागृहनेते पदाची जबाबदारी सांभाळली होती.

तसंच काँग्रेसच्या गटनेतेपदी नगरसेवक ऍडव्होकेट रामचंद्र तथा चंदूशेठ कदम यांची निवड करण्यात आली आहे.

**महात्मा गांधी**

पुणे तसच लगतच्या उपनगरात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आलं. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

**पुरस्कार**

१८ वर्षांवरील अनाथ मुलांच्या कल्याण, शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या तर्पण फाउंडेशनच्या पाचव्या "तर्पण युवा पुरस्कार २०२६" ची अधिकृत घोषणा आज करण्यात आली. यावर्षी हा प्रतिष्ठित पुरस्कार झारखंडमधील अनाथ मुलींचे संगोपन करणाऱ्या नारायण सेवा आश्रमाचे हरेराम पाण्डेय तसेच लातूर येथील खुशीग्राम फाउंडेशनचे संस्थापक मधुकर सोनवणे यांना जाहीर करण्यात आला आहे.

१ फेब्रुवारी रोजी पुण्यातील बावधन येथील हॉटेल मेरी गोल्ड बेंकवेट्स इथं होणाऱ्या पुरस्कार सोहळ्यात पुरस्कार्थींना १ लाख ११ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात येणार असल्याची माहिती तर्पण फाउंडेशनचे संचालक आमदार श्रीकांत भारतीय यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

**व्यंगचित्रकला**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यंगचित्रकला संग्रहालयातर्फे 18 वर्षांवरील सर्वांसाठी २ ते ७ फेब्रुवारी 2026 या कालावधीत सायंकाळी ६.०० ते ८.०० या वेळेत टून कॅम्प' आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये व्यंगचित्रकलेच्या विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार  आहे. व्यंगचित्रकार सूरज 'एस्के' श्रीराम, चारुहास पंडित, प्रशांत कुलकर्णी, प्रा. विवेक मगर, संग्रहालयाच्या क्युरेटर डॉ. प्रिया गोहाड हे मार्गदर्शन करणार आहेत.

**फसवणूक**

शेअर बाजारात गुंतवणुकीवर भरघोस परतावा देण्याच्या नावाखाली एका व्यक्तीची तब्बल ५३ लाख ८७ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी पीडित व्यक्तीने दिलेल्या फिर्यादीनुसार, पुणे सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 18 पूर्णांक 2 दशांश अंश; तर कमाल तापमान 31 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच राहील, तसंच दुपारनंतर आकाश अंशत: ढगाळ राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**